## नियमीत दिवाणी मुकदमा नं. २८/२०१८ निशाण नं. ५ वरील आदेश

वादीचे वकिल श्री. एस. जी. खानोलकर यांचा युक्तीवाद ऐकला. वादीने प्रस्तुतचा दावा हा दावा रस्ता संदर्भात त्याला इजमेंटरी हक्क असल्या संदर्भात व त्या अनुषंगे मनाई मिळण्या संदर्भात दाखल केलेला आहे. प्रस्तुतच्या अर्जाव्दारे वादीने प्रतिवादी क्र. १ ते ५ यांचेविरुध्द एकतर्फा तुर्तातुर्त ताकिद मागितलेली आहे. वादीची बाजू थोडक्यात अशी आहे की, वादी यांची मिळकत ही खाडी किनारी आहे. तर प्रतिवादी यांची मिळकत ही वादी यांचे मिळकतीच्या उत्तरेला आहे. वादी यांच्या मिळकतीला तिन्ही बाजूने खाडीचे पाणी आहे. वादी यांच्या मिळकतीमध्ये त्यांनी कोळंबी प्रकल्प चालू केलेला आहे. त्या प्रकल्पाकरीता व त्यांच्या मिळकतीमध्ये येण्या—जाण्या करीता त्यांना प्रतिवादी यांच्या मिळकतीमधून जी वाट आहे त्या वाटेचा वापर करावा लागतो. ती वाट ही पुढे जावून प्रतिवादी यांच्या मिळकतीमध्येच असणा—या ग्रामपंचायत रस्त्याला मिळते. त्या रस्त्याखेरीज वादी यांना इतर कोणताही रस्ता नाही. सदर ग्रामपंचायत रस्त्यापासून वादी यांच्या मिळकतीकडे येणा—या रस्त्याला प्रतिवादी क्र. १ ते ५ हरकत करीत आहेत. वादी यांनी त्या संदर्भात बरेच नकाशे दाख्ला केलेले आहेत. तसेच इंटरनेटच्या माध्यमातून प्राप्त होणारा नकाशा देखील दाखल केलेला आहे. ज्याची शहानिशा मी प्रथमदर्शतः इंटरनेटचा वापर करुन केलेली आहे. तसेच सदर वाटेसंदर्भात प्रतिवादी यांचे दरम्यान या न्यायालयामध्ये रे. दि.मु.नं. ४/२०११ दाखल होता. त्या दाव्याची कागदपत्र देखील याकामी हजर आहेत. त्यामध्ये त्या दाव्यातील नकाशे देखील हजर आहेत. त्याचे अवलोकन केले असता देखील प्रथमदर्शतः असे दिसते की वादी यांनी नमूद केल्याप्रमाणे वाटेचे अस्तित्व आहे. त्यांना सदर वाटेखेरीज इतर कोणतीही वाट सद्य परिस्थितीमध्ये मला दिसत नाही. अशा परिस्थितीमध्ये वादींनी मागितलेप्रमाणे मनाई न दिल्यास मनाई अर्जाचा हेतू निष्फळ ठरु शकतो. तसेच वादी याची प्रथमदर्शतः बाजू पाहता एकतर्फा आदेश देणे मला योग्य वाटते. सबब मी खालील आदेश पारित करतो.

१. प्रतिवादी क्र. १ ते ५ यांनी त्यांनी हजर होवून म्हणणे मांडण्यापर्यंत स्वतः अगर इतर कोणाही मार्फत दावा रस्त्यावर गडगा घालू नये अगर कोणत्याही प्रकारचा अडथळा करु नये अगर दावा रस्ता बंद करु नये अगर वादींना त्यांचे व्यवसायाकरीता वाहनांची ये—जा करण्याकरीता अडथळा करु नये अशी एकतर्फा तुर्तातुर्त ताकिद देण्यात येते.

२. प्रतिवादी क्र. १ ते ५ यांना कारणे दाखवा नोटीस काढून उपरोक्त नमूद केल्याप्रमाणे दिलेली तुर्तातुर्त ताकिद दाव्याच्या निकालापर्यंत का देण्यात येवू नये अशी नोटीस काढावी. सदर नोटीसमध्ये प्रतिवादींना हजर राहाण्यासाठी दिनांक २४/०५/२०१८ नेमावी.

३. वादींनी दिवाणी प्रक्रिया संहिता आदेशीका ३९ नियम ३ ची पुर्तता करावी.

४. वादीच्या वकिलांच्या तोंडी विनंती वरुन स्पेशल बेलीफला मंजूरी देण्यात आलेली आहे.

सही/—

दिनांक— ०३/०५/२०१८

(वि.द.पाटील)

दिवाणी न्यायाधीश (क.स्तर) वेंगुर्ला.